**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा मुंबई ४०००३१**
**एचओ/ ४८५ /एएलएच दि.२८.०६.२०२३**

# जाहिरात

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आस्थापनेवरील 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता' या संवर्गाची १० रिक्त पदे कंत्राटी पध्दतीनी ६ महिन्यांकरीता भरण्यासाठी खाली नमुद केलेली अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

वैद्यकिय अधिक्षक, ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय यांचे प्रशासकीय कार्यालय, मेजर परमेशवरन मार्ग, वडाळा (प)। मुंबई ४०००३१ येथे दि. १४/०७/२०२३ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यत सादर करावेत.

**कंत्राटी 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता ' पदासाठी शैक्षणिक अर्हता :**

१) उमेदवार उच्च माध्यमिक (१०+२) शालांत परिक्षा उत्तीर्ण असावा.
२)उमेदवाराकडे 'कुष्ठरोग तंत्रज्ञ' म्हणून सरकारमान्य संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र असावे.
३)उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा वा तत्सम परीक्षा किंवा १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
४)उमेदवाराने संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे शासन मान्य संस्थेचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.

**अ) वयोमर्यादा:-**

**उमेदवाराचे अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दि. ०१/०७/२०२३)**

1. उमेदवाराचे वय अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

**ब) 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता ' पदाची कर्तव्यसूची**

1. कुष्ठरोग विषयक सर्वेक्षण, आरोग्यशिक्षण आणि उपचार कार्यक्रमांचे आयोजन करणे.प्रकल्प क्षेत्रातील रुग्णाचा शोध घेणे, रुग्णांच्या नातेवाईकांची तपासणी करणे, रुग्णांचा पाठपुरावा करणे, व विविध विशेष कार्यक्रमाचे आयोजन करणे.

2. समांतरित दवाखान्यांमधील कामे पार पाडणे. त्यामध्ये रुग्णांची प्राथमिक तपासणी, जंतूपरिक्षण, रुग्णांचे कार्ड तयार करणे. तसेच उपचाराच्या नोंदी घेणे व कुष्ठविरोधी उपचार आणि सहाय्यक औषधांचे वाटप करणे. रुग्णांना हातापायांची काळजी घेण्याबाबतचे मार्गदर्शन करणे, नियमित उपचार घेण्याबाबतचे समुपदेशन करणे, बाह्यरुग्णविभागातील रुग्णांना जवळच्या दवाखान्यात /आरोग्यकेंद्रात पाठविणे आणि रुग्णांशी सबंधित दैनंदिन व मासिक नोंदीचा अहवाल तयार करणे.

3. रोग निदानासाठी आवश्यक जंतु परिक्षण, रुग्ण कार्ड व अन्य संबंधित दैनंदिन कामात मदत करणे.

4. दैनंदिन कामाचा त्याचप्रमाणे मासिक कामाचा,त्रैमासिक व वार्षिक कामाचा अहवाल तयार करणे.मासिक आढावा सभा तसेच शैक्षणिक सभा, प्रशिक्षण कार्यक्रम यामध्ये सक्रिय सहभागी होणे.

5. वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली इतर कामे.

**क)एकत्रित मानधन-** दर महा निश्चित मानधन रू.१८,०००/- प्रतिमहा.

**<u>सर्वसाधरण अटी:-</u>**

१) ॲक्वर्थ रूग्णालयाच्या आस्थापनेवरील 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता 'यांच्या रिक्त पदांच्या प्रमाणात आणि कार्यभार पाहून कंत्राटी पद्धतीने प्रत्येकी रु. १८,०००/- (अठरा हजार मात्र प्रतिमाह) मानधनावर ६ महिन्यांच्या कालावधीकरिता स्थानिक पातळीवर 'कंत्राटी तत्वावरील 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता 'या पदांकरिता अर्ज मागवून निवडीने भरण्यात येतील.

२) सदर 'कंत्राटी तत्वावरील 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता 'या पदावर निवडलेल्या उमेदवारांकडून २०० रुपयांच्या बॉन्ड पेपरवर करारनामा(प्रतिज्ञापत्र) घेण्यात येईल.

३) कंत्राटी कालावधीत काम करण्या-या उमेद्वारांची सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरिल सेवेसाठी, सेवाजष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही, तसेच भविष्यात त्यांना 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता ' पदावर हक्क सांगता येणार नाही.

४)सदर पदे ही कंत्राटी तत्वावर भरावयाची असल्याने उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे असावी.

५) सदर उमेदवारांसाठी निवास स्थानांची व्यवस्था केली जाणार नाही.

६)सदर पदांची निवडयादी पदासाठी आवश्यक (Qualifying Exam) मधील गुण म्हणजेच उच्च माध्यमिक (10+2) शालांत परिक्षा आधारे बनविण्यात येईल.

७) शासकिय व निम्म शासकिय संस्थेमध्ये कुष्ठराग तंत्रण म्हणुन अनुभव असल्यास (किमान 0६ महिने अनुभव) प्रत्येक सहा महिन्याच्या काम करण्याच्या अनुभवासाठी दान गुण उच्च माध्यमिक (१० +२) शांलात परिक्षेच्या गुणात अधिक केले जातील.किमान अधिकतम गुण 20 पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.

८) रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी 'कार्यकारी आरोग्य अधिकारी' यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात यईल.

९) सरळसेवेने 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता ' या संवर्गातील पदे भरल्यानंतर कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

डॉ. अमिता पेडणेकर

**वैद्यकीय अधिक्षक**

**ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा मुंबई ४०००३१**

## अर्जाचा नमुना

**पदाचे नाव:- 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता '(कंत्राटी)**
वैद्यकिय अधिक्षक,
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय
यांचे प्रशासकीय कार्यालय,
मेजर परमेश्वरन मार्ग, वडाळा (प)
मुंबई ४०००३१

नमुद केलेल्या **'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता '**कंत्राटी पदाकरिता दि.--------- च्या जाहिरातीनुसार मी.........................................................खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | १) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | |
| | २) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव | |
| | ३) उमेदवाराचे लग्नापूर्वीचे संपूर्ण नाव (महिला उमेदवारांच्या बाबतीत) | |
| २. | पत्ता (पत्र व्यवहाराचा)<br>घरक्रमांक/ इमारती नाव<br>रस्त्याचे नाव विभागाचे नाव<br>आणि शहर पिन कोड नं. | |
| | जवळील रेल्वेस्थानक | |
| | टेलिफोन नं./ मोबाईल नं. | |
| | ई-मेल | |
| ३ | लिंग (पुरूष / स्त्री /इतर) | |
| ४ | (अ) जन्मदिनांक | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (ब) दिनांक ०१ .०७.२०२३ रोजी असलेले वय ----वर्षे-----महिने------दिवस | | |
| | | मिळालेले | पैकी |
| ५. | शालांत परिक्षेत मिळालेले गुण | | |
| ६. | मराठी विषयातील प्राप्त गुण | | |
| ७. | उच्च माध्यमिक परिक्षेत मिळालेले गुण | | |
| ८. | 'कुष्ठरोग तंत्रज्ञ ' म्हणून सरकारमान्य संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र **(अनिवार्य)** | | |
| ९. | कुष्ठरोग क्षेत्रात काम करण्याचा अनुभव | होय / नाही | |
| १०. | संगणक हाताळणीचे मान्यता दिलेला अभ्यासक्रम प्रमाणपत्र | आहे / नाही | |

मी या अन्वये प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरिल माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार, मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठच्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काही ही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहीती खोटी आढळल्यास माझ्या विरूद्ध कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू

अर्जदाराची सही

सोबत:- शैक्षणिक प्रमाणपत्रांची स्थळप्रत

१)

२)

३)